# प्रतिसरकारमधील वीरांगना राजमतीताई पाटील-बिरनाळे

**चंद्रशेखर काशिनाथ काटे**
संशोधक विद्यार्थी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रस्तावना –**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये अनेक समाजघटकांनी आपापल्या परीने सहभाग नोंदवला आहे. यामध्ये त्यांची स्वातंत्र्य प्राप्त करण्यासंबंधीची कल्पना भिन्न असली तरी उद्देश्य मात्र एकच होता. यासाठी विविध लढे, चळवळी, आंदोलने करण्यात आली. इ.स. १९४२ च्या चलेजाव चळवळीवेळी महात्मा गांधी यांनी 'करेंगे या मरेंगे' हा नारा दिल्यामुळे संपूर्ण भारतखंड खवळून उठला होता. महाराष्ट्रामध्ये या आंदोलनाचे लोण गावागावांपर्यंत पोहोचले होते. या चळवळीत शेतकरी, कष्टकरी, कामकरी, बालक, पालक आणि महिला यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. या चळवळीवेळी देशातील मुख्य नेत्यांना अटक झाली. तेव्हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी पुढे होऊन ही चळवळ चालू ठेवली. यामधून अनेक नेतृत्व उदयास आले. विशेषतः यामध्ये स्त्रियांही दिसून येतात. १९४२ च्या आंदोलनामध्ये सांगली जिल्ह्यातील अनेक स्त्रियांनी चळवळीत भाग घेतला यात कृष्णाबाई कुलकर्णी, चंपाबाई सुलतान, कळंत्रे आक्का, विजयाताई लाड, गंगुबाई लाड, लीलाताई पाटील, भगिरधी गुरव, जनाबाई, लक्ष्मीबाई नायकवडी, इंदुताई पाटणकर, हौसाबाई अहिर, रुक्मिणी विभूते, हौसाबाई पाटील आदी स्त्रियांनी भाग घेतला होता.[१] त्यापैकी सातारच्या प्रतिसरकार मध्ये सहभागी झालेल्या राजमती पाटील यांच्याविषयी अधिक माहिती नसल्याने त्यांच्या कार्यकर्तृत्वावर येथे प्रकाश टाकण्यात येणार आहे.

**राजमती पाटील यांचे पूर्वचरित्र –**

राजमती पाटील यांचा जन्म इ.स. १९२० मध्ये सांगली जिल्ह्यातील ऐतवडे या गावात बाबाजी पाटलांच्या घरी झाला होता. त्या लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले होते. स्वातंत्र्य सैनिकांच्या चरित्रकोशात त्यांचे नाव राजमती ऐवजी 'राजुताई' असे दिले आहे. राजमती पाटील यांना अधिक काळ आईची माया लाभली नाही. त्या लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांच्या शिक्षणाचा प्रारंभ वयाच्या १० व्या वर्षी सुरु झाला. त्यांनी आपले शिक्षण जैन श्राविका आश्रम, सोलापूर येथून सुरु केले. यासाठी त्यांना डॉ. श्रीपाल वैद्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सोलापूर येथे असतानाच त्यांची ओळख एक प्रमुख जहालवादी नेते कैलासचंद्र मेहता, भाई विभूते आणि इतर मंडळीशी झाली होती. शाळेत शिकत असताना त्या क्रांतीकाराकांच्या कार्याकडे आकृष्ट झाल्या व त्यांनी स्वतःस स्वातंत्र्य चळवळीस वाहून घेतले. भित्तीपत्रके व बुलेटिन्स तयार करणे व ती वाटण्याचे काम त्या करीत असत. त्यांचे शिक्षण मराठी सातवी इयत्तेपर्यंतच झाले.[२]

**स्वातंत्र्य चळवळीमध्ये प्रवेश –**

राजमती पाटील यांनी १९४२ च्या लढ्यामध्ये सरकारने प्रतिबंध घातलेल्या साहित्याचे वाटप केले होते. या आधी त्यांनी सोलापूर येथील सरकार विरोधी महिलांच्या मोचार्चे नेतृत्व स्वीकारले होते. ९ ऑगस्ट, १९४३ रोजी त्यांनी नऊवारी साडी परिधान करून, कुंकू लावून सोलापुरातील टिळक चौकात 'भारतमाता की जय' हा नारा देत, झेंडा घेऊन मोर्चाचे नेतृत्व केले. यासाठी त्यांना सरकारने नऊ महिन्याच्या सक्तमजुरीची व १०० रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती.[३] त्यांची येरवडा येथील तुरुंगात रवानगी करण्यात आली. आणि हेच त्यांच्या फायद्याचे ठरले. कारण तिथे त्यांना इतर वरिष्ठ स्त्री स्वातंत्र्य सैनिकांना भेटता आले. यामध्ये मुख्यतः प्रेम कंटक, लीलावती पाटील, खान अब्दुल गफारखान यांची सून आणि इतर काही जण होते. अशा येथील एकूण राजकीय महिला कैद्यांची संख्या १५० च्या आसपास होती. योगायोगाने सरकारने त्यांच्या विशिष्ट धोरणाचा भाग म्हणून कैद्यांना मुक्त करण्याचे धोरण स्वीकारले. यामुळेच राजमती पाटील यांची सहा महिन्यानंतर सुटका झाली. सन १९४४ मध्ये कैदेतून सुटून पुन्हा त्या अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण करण्यासाठी गेल्या परंतु, शाळेने आम्ही क्रांतिकारी मुलींना शाळेत प्रवेश देत नाही म्हणून त्यांना पुन्हा शाळेत प्रवेश नाकारला. त्यामुळे त्यांना त्यांच्या गावी परत यावे लागले.

**साताराचे प्रतिसरकार आणि राजमती पाटील –**

राजमती पाटील या घरी परत आल्यानंतर स्वस्थ बसल्या नाहीत. त्यांच्यातील क्रांतीकारी विचार गप्प बसू देत नव्हते. यावेळी देशभरात १९४२ चे आंदोलन थोडेसे थंड पडले असले तरी, महाराष्ट्रात मात्र सातारा जिल्ह्यात आंदोलने सुरु होती. भूमिगत राहून त्यांनी मोडतोड व जाळपोळीच्या कार्यात भाग घेतला होता. ब्रिटीश सरकार भूमिगतांना किंवा क्रांतीकारकांना दडपण्यासाठी परिसरातील दरोडेखोरांचा वापर करत असे. यात मारुती रामोशी, सखाराम बारबट्टे आदी दरोडेखोर होते. परिसरात यांची मोठी दहशत होती. त्यांच्याविरुध्द कोणी तक्रार देत नसत. अशावेळी राजमती ताई यांनी सखाराम बारबट्टे याच्या विरुद्ध तक्रार घेऊन त्या भूमिगत निवृत्ती पाटलांकडे गेल्या. तेव्हा त्यांची हिम्मत पाहून त्यांना क्रांतीकारकांना, भूमिगतांना मदत करण्याची जबाबदारी देण्यात आली. तेव्हा त्या सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकार मध्ये सामील झाल्या. साताऱ्यामध्ये १ जून १९४३ रोजी कामेरी येथे प्रतिसरकार स्थापन झाल्यानंतर काही दिवसांनी मिलिटरी संघटनेची गरज भासू लागली. ही गरज पाहून नागनाथ अण्णा नाईकवडी यांनी इ.स. १९४४ मध्ये एक मिलिटरी संघटना स्थापन केली. यावेळी राजमती पाटील, जी.डी. लाड यांनी सहायक म्हणून मदत केली.

दरम्यानच्या काळात ब्रिटीशांच्या धरपकडीमुळे चळवळीतील नेत्यांना भूमिगत व्हावे लागले. तसेच आपले नाव लपविण्यासाठी अनेक भूमिगतांनी आपली टोपणनावे ठेवली होती. इतरांप्रमाणेच राजमती पाटील यांनी 'ताई' हे टोपणनाव धारण केले होते. त्यांस काही जण 'जैनांची ताई' म्हणूनही संबोधत असत.[४] हे प्रतिरूप धारण करण्यापाठीमागे विशेष कारण होते. 'ताई' हे नाव प्रतिरूप होतेच पण त्याच बरोबर गटातील परस्त्रीकडे पाहण्याचा आदरयुक्त दृष्टीकोन ही या नावातून स्पष्ट होत असल्याने या नावास वेगळे वलय प्राप्त झाले होते.[५] जी.डी लाड हे नंतर तुफान सेनेचे प्रमुख झाले तेव्हा त्यास राजमती पाटील यांनी मोलाची मदत केली.

**महिला तुफान सेना -**

वडूज, इस्लामपूर आणि तासगाव येथे ब्रिटिशांविरोधात निघालेल्या शांतीमोर्चाच्या वेळी सरकारने पाशवी बलाचा वापर केला. यात अनेकजण शहीद झाले. त्यावेळी सरकारच्या विरोधात गनिमी काव्याचा वापर करत, प्रतिसरकारची पण चळवळ सुरु ठेवावी, या उद्देशाने तुफान सेनेची स्थापना झाली होती.[६] राजमती ताई यांना जी.डी. लाड यांस मदत करत असताना असे वाटले की, तुफान सेनेमध्ये महिलांचाही सहभाग असावा म्हणून त्यांनी ऐतवडे येथे महिला तुफान सेनेच्या गटाची स्थापना केली.[७] या महिला तुफान सेनेच्या प्रशिक्षणासाठी कोणकोणत्या महिलांनी सहभाग घेतला होता याची नोंद मात्र सापडत नाही. मात्र सर्व तुफान सेनेतील जवळपास ३० स्त्रिया व सुमारे पाचशे पुरुष यांनी प्रशिक्षण घेतले असे दिसून येते.[८]

**राजमती ताई यांचा शस्त्रास्त्र पुरवठा –**

प्रतिसरकारची ब्रिटीश सरकार विरोधी चळवळ जसजशी वाढत गेली तशी त्यांना शस्त्रास्त्र व दारूगोळ्याची अधिक गरज वाटू लागली. तेव्हा तुफान सेनेच्या माध्यमातून नागनाथ अण्णा नाईकवडी, जी.डी. लाड व राजमती ताई यांनी शस्त्रास्त्रे व दारुगोळा स्वातंत्र्य सैनिकांना पुरविला. एकदा त्यांनी शस्त्रास्त्रे व दारुगोळा पुण्याच्या मिलिटरी कॅम्पमधून आणला होता. हा दारुगोळा आणण्यासाठी राजमती ताई यांना स्वतंत्र कर्नाटक राज्याचे समाज-कल्याण मंत्री व्ही. एल. पाटील यांनी मदत केली होती. राजमती ताई यांनी गोवा, नाशिक, बेळगाव, खडकी येथून बंदुका व काडतुसे प्रतिसरकार चळवळीस पुरवली होती.[९] बंदुका व काडतुसे आणणे व सुरक्षितपणे नियोजित ठिकाणी पोहोच करणे, तसेच ते सुरक्षित ठेवणे, ते भूमिगतांना पुरवणे हे जिकरीचे व हिंमतीचे काम त्या करीत असत. यावरून त्यांच्या खडतर परिश्रमाची व देशसेवेची कल्पना येते.

**धुळ्याचा खजिना लुटला –(१४ एप्रिल १९४४)**

ब्रिटीश सरकारला विरोध करण्यासाठी प्रतिसरकारास पैशाची कमतरता भासत होती. यासाठी प्रतिसरकारमधील भूमिगतांनी सरकारी खजिना लुटण्याचे ठरविले. त्यानुसार जवळपास सोळा क्रांतिकारकांनी धुळे जिल्ह्यातील साक्री येथील खजिना लुटला.[१०] यामध्ये त्यांनी ५ लाखाचा खजिना लुटला. हा खजिना खानदेशातून आपल्या प्रांतात आणण्यासाठी राजमती ताई यांना धोंडीराम माळी हे येऊन घेऊन गेले. त्यावेळेस त्या ऐतवडे येथे होत्या. दोन-तीन दिवसांच्या प्रवासानंतर त्या नाशिक

जवळील म्हसरूळ येथील गजपंथ गुरुकुल आश्रमात पोहचल्या. ताईंच्या मदतीने तो खजिना दांडेली मार्गे रेल्वेने व पायवाटेने सातारकडे सुखरूप पोहचवला.[११] या मिळालेल्या पैशाची वाटणी कशाप्रकारे केली याची माहिती राजमती ताई यांनी दिली आहे. यातील १ लाख डॉ. उत्तमराव पाटील यांना खानदेश चळवळीसाठी, १ लाख अच्युतराव पटवर्धन यांच्याकडे, १ लाख ४० हजार जी.डी. लाड यांना कुंडल ग्रुपसाठी, १ लाख ६० हजार वाळवा ग्रुपसाठी बाकीचा राहिलेला खजिना काशिनाथ नायकवडी (वाळवा) व माझ्याकडे ठेवला होता. नंतर तो नागनाथ अण्णा यांच्या मार्गदर्शनाखाली ताईंच्या हस्ते स्वातंत्र्य चळवळीत फौज उभारण्यासाठी वापरला गेला.

**मंदूरची चकमक अथवा सोनावड्याची लढाई – (२५ फेब्रुवारी, १९४६)**

जशास तसे या न्यायाने भूमिगतांनी सैन्य उभारून ब्रिटीश सत्तेविरूद्ध लढा देण्याचा निश्चय केला. सप्टेंबर १९४५ मध्ये लष्करी संघटना उभारली. लष्करी संघटना बांधण्यासाठी तरुण कार्यकर्ते, पैसे व शस्त्रे मिळवली, मिलिटरी प्रशिक्षणाची व्यवस्था केली. प्रथम ऐतवडे बुद्रूक जवळ असलेल्या ढगेवाडीच्या जंगलात हा कॅम्प उभारला होता.[१२] मात्र या कॅम्पचा सुगावा पोलिसांना लागला असावा असा संशय भूमिगतांना आल्याने नवीन जागेचा शोध सुरु झाला. त्यानंतर शाहुवाडी महालातील बांबवडे गावाजवळील थाबड्याच्या पठारावर क्रांतिकारकांचा तळ पडला. पण तेथेही ते जास्त दिवस राहू शकणार नाही याची खात्री पटल्याने दुसऱ्या जागेचा शोध सुरु केला. शिराळा पेट्यातील मंदूरच्या जंगलातील जागा कॅम्पसाठी निश्चित केली गेली, त्या जागेचे पुर्ननिरीक्षण करण्यासाठी किसन अहिर यांना पाठवण्यात आले होते. यावेळेस पोलिसांना अपरिचित व्यक्तींच्या वावरण्याचा संशय आल्याने ते नियोजनानुसार परत जाऊ शकले नाही. तेव्हा कॅम्पमधील इतरांना काळजी वाटू लागल्याने २४ फेब्रुवारीला रामू अहिर, बंडू नाईकवडी व शामराव पाटील यांना पाठवण्यात आले. पण यांना पोलिसांनी शस्त्रास्त्रासहित पकडले. ही बातमी किसन अहिर यांना समजली.

तिकडे मंदूरला गेलेले सर्वजण परत न आल्याने कॅम्पमध्ये चिंतेचे वातावरण होते. आपल्या सहकाऱ्यांची संकटातून सुटका करण्यासाठी २५ फेब्रुवारीला २०० भूमिगतांनी कॅम्प सोडला. मंदूरजवळ गेल्यावर त्यांना झालेल्या घटनेची माहिती मिळाली. पोलीस स्वातंत्र्य सैनिकांना घेऊन जात असताना पोलीस व क्रांतीकारकांची मंदूरजवळ एका ओढ्यात झटापट झाली. या झटापटीत क्रांतीकारकांमध्ये जोश निर्माण करण्याचे काम राजमती ताई यांनी केले. स्वातंत्र्य सैनिकांना त्या 'वर जा काका', गोळी घाला काका','पुढे जा काका' वगैरे ओरडून प्रोत्साहन व दिग्दर्शन करत होत्या.[१३] यावेळेस पकडलेल्या आपल्या सहकाऱ्यांची सुटका करण्यात ते यशस्वी झाले. पोलिसांनी माघार घेतली. अशाप्रकारे राजमती ताई प्रत्यक्ष मैदानात उतरून आपल्या परीने आपल्या सहकाऱ्यांची मदत करत असत.

भूमिगत नेत्यांची नेमणूक विविध गटात केली जात असे. दिलेल्या गटात त्यांना नेमून दिलेले काम करावे लागे. कुंडल गटाचा मंडल नं. १५ जो पुणे- बेंगलोर रस्त्यापासून वाळवा पर्यंत होता, त्याचे गटनायक नागनाथ नाईकवडी होते तर राजमती पाटील ऊर्फ ताई व वाय. सी. पाटील यांची उपगटनायक पदी निवड केली गेली होती.[१४] नंतर त्या कुंडल गट सोडून दक्षिण वाळवा गटात कार्य करू लागल्या. त्यांच्या सरकार विरोधी कारवायांमुळे सरकारने त्यांच्या विरुध्द वॉरंट जारी केले होते. मात्र नंतर ते १९४६ साली रद्द केले गेले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर त्यां चळवळीतून बाहेर पडल्या.

अशा धाडसी राजमती ताई यांनी स्वातंत्र्य चळवळीतील एक प्रमुख नेते व सहकारी पहिलवान बळवंतराव बिरनाळे (मूळ गाव अंकलखोप, सांगली जिल्हा) यांच्याशी १९५० मध्ये विवाह केला व त्या राजमती पाटील-बिरनाळे झाल्या. त्यांचा मृत्यू ऑक्टोबर २००३ मध्ये झाला.

**मूल्यमापन –**

प्रतिसरकारमध्ये राजमती ताई यांनी नागनाथ अण्णा नाईकवडी, जी.डी. लाड व बळवंतराय बिरनाळे यांच्या बरोबर ब्रिटीश विरोधी कारवायामध्ये व समाजकार्यामध्ये सहकार्य केले. विशेषतः सांगली परिसरामध्ये हे कार्य केल्याचे दिसून येते. राजमती ताई यांना संरक्षण, भूमिगत सैनिक, शस्त्रे व दारूगोळा आणणे, भूमिगतांचे संदेश एकमेकांना पोहचवणे, शांतता पसरविणे अशी निदर्शानात्मक कार्ये आणि कधी कधी भूमिगतांसाठी जेवण बनविणे अशी कार्ये केली होती. प्रतिसरकारमध्ये नागनाथ

अण्णा यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामराज्यांची संकल्पना राबवली जात होती. त्यातही राजमती ताई यांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले. डॉ. आबासाहेब शिंदे म्हणतात की, 'भूमिगत भूमिगत राहू शकले ते या स्त्रियांच्या सहकार्यामुळेच'. स्वातंत्र्यानंतर त्यांच्या नावाने सांगली मध्ये गर्ल्स हायस्कूल आणि कन्या महाविदयालय स्थापन केले गेले.

**संदर्भ** –

१. गुरव बाबुराव, परिवर्तनवादी डॉ. बाबुराव गुरव समग्र साहित्य, खंड पहिला, निर्मिती संवाद प्रकाशन, कोल्हापूर, पृ. ४६०.

२. रुद्रवाणी, (मासिक) १५ ऑगस्ट, १९८२, पृ. २२.

३. कुंटे, भ.ग. (संपा.), स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, पश्चिम विभाग, खंड ३, दार्शनिका विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, १९८०, पृ. ९६२.

४. शिंदे आबासाहेब, सातारचे प्रति-सरकार : प्रसंग आणि व्यक्ती, उषा प्रकाशन, कोल्हापूर, १९८७, पृ.८६.

५. क्रांतिवीर किसन वीर जीवन दर्शन, भाग ४, पृ. ३७, फाईल नं. ३ आय.एन.सी. ४४-६ (२८२).

६. सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगली जिल्ह्याच्या इतिहासाची सुवर्ण पाने, आदित्य प्रकाशन, सांगली, २०१३, पृ.५९.

७. शिंदे आबासाहेब, सातारचे प्रतिसरकार, उषा प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २००३, पृ. ४६५.

८. अहिर जयवंत, क्रांतिवीर नागनाथ अण्णा, हुतात्मा प्रकाशन, वाळवा, २०१२, पृ.९८.

९. दैनिक सकाळ, १५ ऑगस्ट, २०२२.

१०.उपरोक्त, शिंदे आबासाहेब, सातारचे प्रति-सरकार : प्रसंग आणि व्यक्ती, पृ.७५.

११. उपरोक्त, अहिर जयवंत, क्रांतिवीर नागनाथ अण्णा, पृ.९८.

१२. उपरोक्त, शिंदे आबासाहेब, सातारचे प्रति-सरकार : प्रसंग आणि व्यक्ती, पृ.९१.

१३. उपरोक्त, शिंदे आबासाहेब, सातारचे प्रतिसरकार, पृ. २८३.

१४. उपरोक्त, अहिर जयवंत, क्रांतिवीर नागनाथ अण्णा, पृ.६४-६५.